(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**June -2020**

**ISSUE No-CCXXXV(235)**




Prof. Virag.S.Gawande
**Chief Editor :**
Director
Aadhar Social Research &,
Development Training Institute,
Amravati,

Dr. R.S.Sathhai
**Executive Editor**
**Local Secretary**
**Adv.B.D.Hambarde** Mahavidyalaya
Ashti

**Guest Editor**

Dr. S.R.Nimbore
**Principal**
**Adv.B.D.Hambarde**
Mahavidyalaya Ashti

Dr. Satish Kadam
**President,AMIP&**
Head,Dept of History
YCM,Tuljapur

Dr. Shivraj Bokade
**Secretary,AMIP&**
Head,Dept of History
YC,Nanded

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

International Impact Factor Services (IIFS)

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

| | | |
|---|---|---|
| 104 | शोषणमुक्त, समतायुक्त व राष्ट्रनिष्ठ समाजनिर्मितीसाठी लढणारे महापुरुष - डॉ.बाबासाहेब आंबेडकर **डॉ.संतोष सुधाकरराव कोदुरवार** | 476 |
| 105 | तेर : प्राचीनातून नाशाकडे **डॉ.विनोद बाबुराव बोरसे** | 479 |
| 106 | प्राचीन मराठवाड्यातील (धर्मपुर) धर्मापुरी एक वैभवशाली नगर,बाजारपेठ आणि धार्मिक व सांस्कृतिक केंद्र **डॉ.गंगथडे आर.डी.** | 486 |
| 107 | देवगिरी किल्ला : मराठवाड्यातील ऐतिहासिक वारसा **डॉ.केशव अंबादास ल्हाने** | 489 |
| 108 | कोविड १९ महामारीतील आहाराचे आयोजन **प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे** | 497 |
| 109 | महात्मा गांधीजींच्या रचनात्मक कार्याची कर्मभूमी – सेवाग्राम आश्रम **डॉ.स्मिता म. जाधव** | 501 |
| 110 | मराठवाड्यातील गढी/वाड्यातील: जलव्यवस्थापन ***प्रा. डॉ. डी. एस. बिराजदार*** | 508 |
| 111 | दारिद्र्य निमूर्लनामध्ये सामाजिक सुरक्षा उपायांच्या भूमिकेबद्दल डॉ. अमर्त्य सेन यांचे विचार **प्रा. चंद्रशेखर फरकाडे** | 513 |
| 112 | हरिहरराव देशपांडे यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान **प्रा.डॉ.गोविंद तिरमनवार** | 519 |
| 113 | बदलत्या वातावरणामुळे हवामानातील झालेले परिणाम **प्रा.डॉ.सोमनाथ गुंजकर** | 527 |
| 114 | साहित्य आणि चित्रपट : विशेष संदर्भ – नारायण हरी आपटे. **प्रा.हमीद उमरअली काझी** | 526 |
| 115 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार **डॉ.जाधव राजेश्री अप्पाराव** | 532 |
| 116 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक कार्य **प्रा. जयंत विरुळकर** | 537 |
| 117 | महात्मा गांधीजींच्या चळवळीतील मागण्यांचा स्वातंत्र्य चळवळीवर प्रभाव : एक अभ्यास **प्रा. जयवंत नथ्थूजी काकडे** | 543 |
| 118 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य **श्री. अजितकुमार भिमराव पाटील** | 548 |
| 119 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात चंद्रपुरचे सिंह खुशालचंद खजांची यांचे योगदान **प्रा.डॉ.कैलास रामचंद्र भांडारकर** | 552 |
| 120 | चार्वाक दर्शन : एक विचारप्रवाह **डॉ. किरण शिवाजीराव पाईकराव** | 556 |
| 121 | उस्मानाबाद तालुक्यातील गोरक्षणदर्शक वीरगळ : समकालीन शेतीप्रधान समाजव्यवस्थेचे निदर्शक **प्रा.डॉ.कुलकर्णी जयश्री रमेश** | 560 |
| 122 | हैद्राबाद मुक्तिसंग्रामात सोलापूरच्या आर्य समाजाने दिलेला ऐतिहासिक लढा **प्रा. लक्ष्मी मधुकर रेड्डी** | 566 |
| 123 | चिनी बौद्ध प्रवासी – चर्चा आणि चिकित्सा **प्रा. डॉ. माधवी खरात** | 571 |




Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S)

Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235

ISSN : 2278-9308
June 2020

# बदलत्या वातावरणामुळे हवामानातील झालेले परिणाम

प्रा.डॉ.सोमनाथ गुंजकर

**इतिहास विभाग,**

**श्री.गुरू बुध्दिस्वामी महाविद्यालय,पूर्णा जं.**

हवामान बदलाचे अनेक चांगले वाईट परिणाम वातावरणात दिसत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरीकापासुन ते शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांवर त्यांचे दुरगामी परिणाम होत आहेत. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे वनातील एकुण क्षेत्र २०%पेक्षा कमी झाले आहे. याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झालेला आहे. शहरामध्ये हवा, वायु, ध्वनी प्रदुषणाचे प्रमाण सतत वाढत आहे. शहरातील अनेक नद्या कारखाण्यांमुळे प्रदुषीत झाल्या आहेत. मानवाच्या गरजा भागविण्यासाठी अनेक नवनवीन शोध लावले जात आहेत. त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे[1]. वातावरणातील बदलामुळे पर्यावरणातील जलव्यवस्थापन, हवामान यांच्यात मोठे बदल होत आहेत. या बदलाचा परिणाम नागरीकांवर होत आहे. विकासाच्या नावाखाली गेल्या काही दशकामध्ये जी वृक्षतोड झाली आहे, पर्यावरणाची हानी झाली आहे. सिमेंटचे पर्वत निर्माण झाले आहेत, शहरातील वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. यासर्व घटनेमुळे प्रदुषणाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. या सर्व गोष्टीचा परिणाम मानवी जीवनावर, हवामानावर होत असुन कार्बन उर्त्सजनामुळे हे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. हवामान बदलाचा विचार करायचा झाल्यास ज्या प्रमाणे प्रत्येक देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मीक संस्कृती वेगवेगळी आहे, त्याचप्रमाणे भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. जसजशी लोकसंख्या वाढत आहे तसतसे वातवरणात बदल होत आहेत. व या वातावरणातील बदलामुळे अनेक समस्या निर्माण होवु लागल्या आहेत. वाढते शहरीकरण, उद्योगधंद्ये व त्यामुळे होणारी जंगलतोड, या जंगलतोडीमुळे वातवरणातील बदल झपाटयाने होत आहे. पावसाचे प्रमाण कधी जास्त तर कधी अनिश्चिततेचे वाटत आहे. जंगले झपाटयाने नष्ट होवु लागली आणि वस्त्या झपाटयाने वाढु लागल्या त्यांचा विरोधाभास प्रक्रियेमुळे पावसाचे प्रमाण कमी होवु लागले[2].

विसावे शतक हे मानवाच्या इतिहासातील विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीचे पर्व ठरले आहे. वाढत्या औद्योगिकीकरणा बरोबरच प्रामख्याने हवामानातील बदल आणि कमी होणारा संरक्षक ओझोन थर असे चिंताजनक प्रश्न आज जगासमोर आ वासुन उभे राहीले आहेत. या सर्व प्रक्रियेमुळे संपुर्ण जीवनसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. औद्योगिकीरणाच्या काळात सुरू झालेल्या मोठमोठया कारखाण्यांमधुन होणारे प्रदुषण त्यामुळे वातवरणातील कार्बनडायऑक्साईड आणि मिथेन सारख्या घातक आणि विषारी वायुचे प्रमाण वाढले आहे. या सर्व प्रकियेमुळे वातावरणातील बदल पृथ्वीवरून परावर्तीत होणारी सुर्यकिरणे पृथ्वीच्याच वातवरणात राहील्यामुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे[3].

**हवामान बदलाचे धोके :**

वारंवार होणारे वातावरणातील बदल यामुळे मानवी जीवनावर वेगवेगळे परीणाम दिसुन येत आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर जागतिक लोकसंख्या आणि आर्थिक वाढ यामध्ये प्रचंड प्रमाणात दरी निर्माण झाली आहे. कधी नव्हे इतक्या मोठया प्रमाणात कारखानदारीची निर्मीती मनुष्याच्या अस्तित्वाला धोक्का देणारी ठरू शकते. कारण वातावरणातील कार्बनडायऑक्साईड, मिथेन, नायट्रेट



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Mandal, Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ऑक्साईड यांचे सद्याच्या वातावरणातील प्रमाण तुलनेने वाढत आहे. त्यामुळे मानवी जीवनावर हवामान बदलाचे धोके दिसुन येत आहेत.

1) **कृषीक्षेत्रावरील परीणाम** : वातावरणातील वाढते प्रदुषण आणि वेगवेगळया कारणानी हवामानात झालेले बदल कृषीक्षेत्रावर होत असलेले दुष्परीणाम यांमधुन शेती उत्पादनावर मोठया प्रमाणात परिणामकारक ठरत आहेत. नैसर्गिक वातावरणात शेती उत्कृष्ट असु शकते परंतु त्यामध्ये बदल झाले तर हे ऋतुचक्र बिघडु शकते त्यामुळे बदलत्या वातावरणात कोणकोणती पिके घ्यावीत याचे ज्ञान शेतकऱ्याला असणे अतिषय महत्वाचे आहे. वातावरण बिघडले तर येणारे पिक व्यवस्थित येणार नाही त्यामुळे होणारे उत्पादन कमी प्रमाणात होईल. त्याचाच परिणाम अन्नधान्यावर होईल. ऋतुप्रमाणे पिके जरी घेतली तरी पदरात पडे पर्यंत शाश्वती नसते अचानक पाऊस आला तर पिके हातातुन जाण्याची शक्यता असते. त्यामुळे वातावरणातील बदलामुळे शेती व्यवसायावर सुध्दा परिणाम दिसुन येतो. तापमानवाढ आणि बदलत्या हवामानामुळे नदी नाले, विहीरी यांचे पाणी कधी जास्त तर कधी कमी होत असते. याचा दुष्परीणाम अन्नधान्यावर होतो कारण पिकाचे उत्पादन झाले नाही तर आर्थिक संकट निर्माण होवु शकते.

2) **मानवी आरोग्यावर परिणाम** : बदलत्या हवामानाचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. कारण रोजगाराच्या निमीत्ताने बरेच कुटुंब शहरी भागात राहण्यासाठी जातात. परंतु अपुऱ्या सोयीसुविधांमध्ये त्यांना आपले जीवन जगावे लागत असते. व्यक्तिच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक समतोलाची समन्वयासाठी आरोग्य अतिशय महत्वाचे आहे. व्यक्तीचे शरीर, मन निरोगी राहण्यासाठी वातवरण चांगले राहणे अतिशय महत्वाचे आहे. वातावरण किंवा हवामानात जर बदल झाला तर त्याचा परिणाम मानवाच्या कार्यशक्तिवर होत असतो. कारण वातावरणामुळे आरोग्य बिघडले तर आपण कोणतेही कार्य व्यवस्थित करू शकणार नाही ग्रामीण भागातील वातावरण शहरीभागा पेक्षा समाधानकारक असते. शहरी भागात उष्णतावाढ, वादळे अतिवृष्टीच्या घटना, किनारी भागातील पुर, दरडी कोसळणे हवेचे प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण इत्यादी समस्या शहरी भागात असतात. त्यामुळे वातावरण बदलले की, शहरी भागातील लोकांचे जीवन विस्कळीत होते.

3) **वातावरणाचा परिणाम** : जागतिक तापमानवाढ १.५ डिग्री. से. च्या खाली ठेवण्याच्या उदिष्टापासुन जग पुर्ण पणे भरकटलेले आहे. आणि आता जागतिक तापमानवाढीची वाटचाल ३ डिग्री से. कडे होत असल्याच वैज्ञानिकांचे मत आहे. जागतिक तापमानवाढ १.५ डिग्री से. च्या खाली ठेवण्याचे उदिष्टय गाठायचे असेल तर आपल्याला उर्जेच्या वापराबाबत वेगवान, दुरगामी आणि अभुतपुर्व बदल करावे लागतील. या गोष्टीसाठी आपल्याला खुप मोठी किमत मोजावी लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याला उर्जेचा वापर कमीत कमी कसा करता येईल यासाठीही उपाययोजना कराव्या लागतील. वातावरणातील बदलामुळे व पर्यावरण संरक्षणासाठी आपल्याला अत्यावश्यक बदल तातडीने करून घ्यावे लागतील. असे झाले तर आपल्याला जशी उपकरण आणि यंत्रे लागतील जी वातावरणातल्या कार्बनला कैद करू शकतील मग ही कार्बन आपण खोल जमीनीत साठवुन ठेवु यासाठी उपाययोजना कराव्या लागतील[ड].

4) **वातावरणातील बदल ठरताहेत घातक** : वातावरणात अचानक होत असलेल्या बदलामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम जाणवत आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या जीवसृष्टीला वातावरणानुसार जगण्याची सवय पडलेली आहे. त्यात वेगवेगळया ऋतुमध्ये वातावरणाशी जुळवुन घेण्याशी मानवाचे शरीर बळकट होणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु हे सर्वांना शक्य नसल्यामुळे काहींना आजारांना सामोरे जावे लागते. असे आजार जिवघेणे ही ठरू शकतात.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

पृथ्वी नष्ट होण्याचे संकट दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यासाठी पाणी आणि वातारणातील बदल पुर्णपणे जबाबदार आहेत. एका संशोधनात मिळालेल्या माहिती नुसार अंटार्क्टिका मध्ये जमीनिच्या पातळी पासुन खाली वाहत असलेल्या हीमनद्या खुप गतीने वितळत आहेत. ही धोक्याची घंटा असुन अंटार्क्टिकामध्ये पृथ्वीच्या आत एवढे मोठे परिवर्तन हे अभुतपुर्व आहे. जी सर्वात महत्वाचीबाब आहे ती म्हणजे बर्फ वितळण्याचा परिणाम पृथ्विच्या आत ४०० कि.मी. खाली दगडावर पडतोय हे काळजी करण्यासारखे आहे. हे वातावरण असेच राहीले तर मानवाच्या जीवनाला धोका निर्माण करू शकतात. वेळीच हे वातावरणीय धोका माणसाने लक्षात घेतले नाही तर येणारे संकट हे मानवानेच ओढावुन घेतलेले असु शकते. वातावरणातील हे सर्व बदल रोखण्यासाठी वेळीच उपाययोजना करणे हे पृथ्वी व पृथ्वीवरील सजीवसृष्टीसाठी हितकारक ठरु शकते.

**हवामान बदलावर उपाय :**

पर्यावरणाचे संतुलन आणि हवामानातील बदल रोखण्यासाठी वृक्षारोपण चळवळ करणे काळाची गरज आहे. ही चळवळ व्यापक बनली तरच पर्यावरण संतुलीत राहुन मानवी जीवन टिकु शकेल नाहीतर या जीवसृष्टीचे वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही. वाढते प्रदुषण, विजेचा अतिवापर, ध्वणीप्रदुषण, हवाप्रदुषण, औद्योगिक क्रांतीमुळे भरमसाठ निर्माण होणारे कारखाणे यामुळे वातावरणातील वाढते कार्बनचे प्रमाण यामुळे मनुष्याचे जीवन ऑक्सिजन नसणाऱ्या रबोट सारखे होईल. हे प्रदुषण वेळीच आटोक्यात आले नाही तर हवामान बदलाचे दुष्परीणाम मानवी जीवनावर दिसुन येतील. त्यासाठी पर्यावरण संतुलनासाठी पर्यावरण पुरक औद्योगिक विकास, हरितगृहामधील वायुचे उत्सर्जन रोखणे, जंगलतोड कमी करणे वृक्षारोपण करणे, वनराई सारख्या योजना अंमलात आणणे व त्याच बरोबर ग्रामिण भागातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे अतिशय महत्वाचे आहे. तरच जीवनसृष्टी या वातावरणात टिकु शकेल". प्रत्येकाने आपापल्या परीने जमेल तेवढे पर्यावरण चांगले राहण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर योग्य प्रमाणात करावा. छोटया मोठया गोष्टिंचा पर्यावरणाला धोका होईल त्यामुळे समतोल बिघडेल असे कृत्य मानवी जीवनाने करू नये. हवामान बदलाचा मानवी जीवनावर खुप मोठया प्रमाणात दुष्परीणाम दिसुन येईल".

**निष्कर्ष :**

1) जगातील प्रत्येक नागरीकाला पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या गोष्टीचा वापर करून वायुप्रदुषण, ध्वणीप्रदुषण, जलप्रदुषण कमी करण्यासाठी वेगवेगळया गोष्टींचा वापर करावा लागेल. डिझेल व पेट्रोल ऐवजी विजेवर चालणाऱ्या काही प्रमाणात गाडयांचा सहवास करावा लागेल.

2) विजनिर्मीती कोळश्यापासुन करण्याऐवजी नैसर्गिक स्त्रोतापासुन सौरउर्जा, पवनउर्जा, जलउर्जा यांपासुन विजनिर्मीती करुन ग्लोबल वार्मिंगच्या समस्येकडे आता सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

3) वतावरणातील बदलामुळे वाढते उष्णतेचे प्रमाण, पाण्याची टंचाई या गोष्टींमुळे जनतेच्या मुलभुत जीवनावश्यक बाबींवर परिणाम होवु शकतो.

4) हवामानातील बदलामुळे मानवी जीवनावर होणारे वाईट परिणाम कमी करण्यासाठी रिकाम्या जागी वृक्षारोपण करणे, व त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तरच वातावरणातील बदल सजीव सृष्टीचे संरक्षण करु शकतील.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

संदर्भ सुची :

1) दै. सकाळ ॲग्रोवन, हवामान बदलानुसार संशोधन हवे, दि. २५.०७.२००७.
2) महाजन प्रविण, जलसंवाद, इंडिया वॉटर पोर्टल, हवामान बदल जागतिक संकट, दि.०३.०४.२०१६.
3) देसाई रणजीत, हवामानातील बदल, वर्ल्ड प्रेस कॉम.
4) बी.बी.सी. न्युज मराठी, हवामान बदल, ही शेवटची धोक्याची घंटा आहे. दि.०८.१०.२०१८.
5) मोहिते वि.एस., लोकमत, दि. २३.०३.२०१५.
6) पुराणिक वैभव, दै.सकाळ, सामाजिक हवामान बदलाचा इशारा. दि. ०५.०३.२०२०.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani